पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - १६ दिनांक - ०६/०१/२०२४**

गुन्हे शाखा, पुणे शहर

## रेकॉर्डवरील गुन्हेगार शरद हिरामण मोहोळ खुन प्रकरणी गुन्हे शाखेने ८ तासात आरोपींना केले जेरबंद

कोथरुड मधील रेकॉर्डवरील गुन्हेगार शरद हिरामण मोहोळ वय ४० वर्ष रा. सुतारदरा कोथरुड पुणे याच्यावर शुक्रवार दि. ०५/०१/२०२४ रोजी सुतारदरा येथुन त्याचे स्वतःचे घरी जाताना त्याचे सोबतच असलेला त्याचाच साथीदार आरोपी नामे मुन्ना उर्फ साहील पोळेकर रा. सुतारदरा कोथरुड पुणे याने त्याचे दोन साथीदारांसह गोळीबार करुन शरद मोहोळ याचा निर्घुन खुन केला होता. सदर बाबत कोथरुड पोलीस स्टेशन येथे गु.रजि.नं. २/२०२४ भा.द.वि.कलम ३०२, ३०७, ३४ आर्म ॲक्ट कलम ३/७(२५), महा.पोलीस अधिनियमचे कलम ३७(१) सह १३५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्ह्याची संवेदनशीलता ओळखुन मा. पोलीस आयुक्त रितेशकुमार पुणे शहर यांनी मा. सह पोलीस आयुक्त,श्री. रामनाथ पोकळे व पोलीस उप आयुक्त श्री. अमोल झेंडे गुन्हे शाखा, पुणे शहर यांना तात्काळ आरोपींचा शोध घेवुन कारवाई करण्याच्या सुचना गुन्हे शाखेला दिल्या होत्या. त्यानुसार पोलीस उप आयुक्त श्री. अमोल झेंडे गुन्हे शाखा, पुणे शहर व सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे १ श्री. सुनिल तांबे यांनी गुन्हे शाखेची ९ पथके तयार करुन आरोपीच्या शोधासाठी पुणे शहर परीसर, मुळशी, सातारा, पुणे ग्रामीण व कोल्हापुरच्या दिशेने रवाना केली होती.

दरम्यान खंडणी विरोधी पथक-२ चे अधिकारी व अंमलदार यांना मिळालेल्या गोपनीय माहीती नुसार आरोपी गुन्हा केल्यानंतर चारचाकी वाहनातुन पळुन गेलेले आहेत. व प्राप्त सी.सी.टी.व्ही. विश्लेषणातुन सदरचे आरोपी मुंबई बेंगलोर हायवे रोडने सातारा रोडच्या दिशेने गेल्याचे निष्पन्न झाले. गोपनीय बातमीदार व सी.सी.टी.व्ही. फुटेजद्वारे आरोपी निष्पन्न करुन वापरलेल्या चारचाकी वाहन क्रमांकाचा शोध लावुन नमुद गुन्हयातील आरोपी हे खेड शिवापुर टोलनाका पास होवुन पुढे जात असल्याची माहीती प्राप्त झाली. त्यानुसार पोलीस उप आयुक्त श्री. अमोल झेंडे यांनी खंडणी विरोधी पथक -१ व गुन्हे शाखा युनिट -१ चे अधिकारी व अंमलदार यांच्या पथकांना आरोपीच्या शोधाकरीता तात्काळ मुंबई बेंगलोर हायवेने साता-याच्या दिशेने रवाना केले. त्याच बरोबर पोलीस उप आयुक्त श्री. अमोल झेंडे यांनी पोलीस अधिक्षक सातारा यांचेसी संपर्क साधुन सातारा मार्गावर व शिरवळ, आणेवाडी टोलनाका, महाबळेश्वर फाटा, वाई परीसरात नाकाबंदी लावण्यात आली. त्यानुसार नमुद पथकांनी आरोपींचा शोध घेत असताना पुणे सातारा रोडवर किकवी जवळ तपासात निष्पन्न झालेली संशयीत स्वीफ्ट गाडी क्र. एम.एच. १२ व्ही.क्यु ९५०० या गाडीचा तब्बल ५ कि. मी. पाठलाग करुन आरोपी नामे १) साहील उर्फ मुन्ना संतोष पोळेकर वय २० वर्ष, रा. शिवशक्ती नगर, गल्ली नं. २७/७ सुतारदरा कोथरुड पुणे, २) नामदेव महीपती कानगुडे वय ३५ वर्षे, रा. भुगाव ता. मुळशी जि. पुणे ३) अमित उर्फ अमर मारुती कानगुडे वय २४, रा. लेन नं. ९५ स्वराज्य मित्र मंडळ पर्वती पुणे, ४) चंद्रकांत शाहु शेळके वय २२ वर्ष, रा. लेन नं. ९४ जनता वसाहत पर्वती पुणे, ५) विनायक संतोष गाव्हणकर वय २० वर्ष, रा. पौड, ता. मुळशी जि. पुणे, ६) विठ्ठल किसन गांदले वय ३४ वर्ष, रा. शिवकल्याण नगर सुतारदरा कोथरुड पुणे, ७) ॲड. रविंद्र वसंतराव पवार, वय ४० वर्ष, रा. नांदेगाव ता. मुळशी जि. पुणे,

८) ॲड. संजय रामभाऊ उडान वय ४३ वर्ष, रा. भुसारी कॉलनी कोथरुड पुणे यांना स्वीफ्ट गाडी क्र. एम.एच. १२ व्ही.क्यु ९५०० व महींद्रा एक्सयुव्ही ७०० एम.एच. १२ यु.एफ.८२८२ या वाहनांसह ताब्यात घेतले. सदर वेळी त्यांच्या ताब्यातुन गुन्हयात वापरलेले ३ गावठी पिस्टल, ३ मॅगझीन, ५ जिवंत काडतुसे ८ मोबाईल हॅन्डसेट, रोख रक्कम असा एकुण २२,३९,८१०/- रु.चा माल हस्तगत केला. नमुद आरोपींनी सदरचा गुन्हा हा शरद मोहोळ बरोबर असलेल्या जुन्या वादाच्या कारणावरुन केला असल्याचे प्रथमदर्शनी उघड झालेले आहे.

गुन्हे शाखा पुणे शहर यांनी तात्काळ कारवाई करुन घटनास्थळी गोळीबार करणा-या व त्यांना मदत करणा-या आरोपींना ८ तासाच्या आत ताब्यात घेवुन संवेदनशील खुनाचा गंभीर गुन्हा उघडकीस आणून उत्कृष्ट कामगिरी केली आहे.

सदरची उल्लेखनीय कामगिरी ही मा.पोलीस आयुक्त, श्री. रितेश कुमार, मा.सह पोलीस आयुक्त, श्री. रामनाथ पोकळे, मा. पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री. अमोल झेंडे, सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-१ श्री. सुनिल तांबे, यांचे मार्गदर्शानाखाली पोलीस निरीक्षक श्री प्रताप मानकर,अजय वाघमारे, शब्बीर सय्यद,श्रीहरी बहीरट, महेश बोलकोटगी, सोमनाथ जाधव, उल्हास कदम, सुनिल थोपटे, क्रांतीकुमार पाटील सहा. पोलीस निरीक्षक अभिजीत पाटील, पोलीस उप निरीक्षक मोहनदास जाधव, श्रीकांत चव्हाण, राहुल पवार, राजेंद्र पाटोळे, पोलीस अंमलदार चेतन शिरोळकर, सुरेंद्र जगदाळे, सचिन अहिवळे, संग्राम शिनगारे, सैदोबा भोजराव, अमोल पिलाणे, अमोल आव्हाड, राजेंद्र लांडगे,रविंद्र फुलपगारे, दुर्योधन गुरव, सयाजी चव्हाण, विजय कांबळे, प्रविण ढमाल, विजय कांबळे, राहुल मखरे, अनिकेत बाबर, अभिनव लडकत, शशिकांत दरेकर, ज्ञानेश्वर चित्ते, सुमित ताकपेरे, श्रीकांत दगडे, साई कारके, ऋषिकेश ताकवणे, नितीन मुंडे यांनी केलेली आहे.